# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २१/०८/२०२२ (रविवार)

---

## चोरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :– अंतर्गत मौजा रामनगर कोंढाळी १ फर्लांग उत्तर. येथे राखीचा सण असल्याने फिर्यादीने आपले घरातील दिवानात ठेवलेले सोन्याचे दागिने घालणे असल्याने ठेवलेल्या ठिकाणी पाहायला गेली असता, नमुद वर्णनाचा माल जुने वापरते १) सोन्याचे १५ ग्रॅम गोफ कि ३०,०००/–रू, २) ५ ग्रॅम अंगठी कि १०,०००/–रू, ३) १ ग्रॅम मनगट कि २०००/–रू, ४) बदामी ५ ग्रॅम अंगठी कि १०,०००/– ५) २६ ग्रॅमची पोथ कि ५२,०००/–रू ६) ८ ग्रॅम गोफ व १ ग्रॅम लॉकेट कि १८,०००/–रू, ७) कानातले ७.५ ग्रॅम कि. १५,०००/–रू असा **एकुण ६८.५ ग्रॅम सोन्याचे दागिने एकुण किंमत १,३७,०००/–रू चा माल** संशयीत आरोपीने दिनांक ०४/७/२२ चे २२/०० वा ते ११/०८/२२ चे २०/३० वा दरम्यान चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गं. भा. वंदणा छत्रपाल जयपुरकर वय ४७ वर्ष रा रामनगर कोंढाळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे **संशईत आरोपी नामे– रोशन रमेश देशमुख रा वाडी नागपुर** यांचे विरूध्द कलम ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो ना मंगेश धारपुरे मो क्र ८२०८३७२१९५ हे करीत आहे.

## गंभीर दुखापत

**पोलीस स्टेशन काटोल** :– अंतर्गत मौजा सोनखांब १५ किमी पुर्व. यातील फिर्यादी व आरोपी हे पती –पत्नी असुन आरोपी हा फिर्यादीचे चारीत्रावर संशय घेवुन तीला नेहमी मारहान करतो. त्यामुळे फिर्यादी ही एक महीन्यापासुन माहेरी सोनखांब येथे आईचे घरी राहत होती. दिनांक २०/०८/२२ चे १४/०० ते १४/२० वा .दर. फिर्यादी ही सोनखांब येथे आईचे घरी हजर असता, तेथे आरोपी हा दारू पिवुन गेला व ”तु आताच्या आता माझे सोबत घरी चाल“ असे म्हटल्याने फिर्यादी हीने “तु दारू बंद कर आणि सुधर” तेव्हां मी येते, असे म्हटले असता, फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. व खिशातील चाकुसारखी कोणतीतरी धारधार वस्तु काढुन फिर्यादीचे डावे हाताचे मनगटावर व डावे हाताचे करांगळी जवळ मारहान केली, त्यामुळे डावे हाताच्या करांगळी जवळील बोटोचे मधात जबर मार लागुन रक्त निघत आहे,

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. वैशाली उत्तम मानेराव वय ३४ वर्ष रा. वडविहरा तह.काटोल जि. नागपुर येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३२६,५०४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयातील **आरोपी नामे– उत्तम शंकर मानेराव रा.वडविहरा तह.काटोल यास अटक** करण्यात आली असुन पुढील तपास– पोलीस उप निरीक्षक/ जवाहर चव्हाण मो नं ९०६७९६७१८१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कोंढाळी :–** अंतर्गत एन.एच.५३ रोड दुधाळा शिवार २ किमी पुर्व. येथे दिनांक २०/०८/२०२२ चे १५/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपली हिरो पॅशन प्रो मोटर सायकल क्र एम.एच. ४० बि.क्यु.७४८६ वर आपले मुलाबाळासह पाच जण कोंढाळी कडे येत असता, नागपुर कडुन अमरावतीकडे जाणारी मालवाहु बोलेरो वाहन क्र एम.एच २७ बि.एक्स. ०२७३ चे चालकांने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणाने चालवुन अचानक ब्रेक मारून गाडीवरील नियंत्रण सुटल्याने नमुद मोटर सायकलला मागुन धडक देवुन अपघात करून मोक्यावरून पळुन गेला, मोटर सायकल वर बसलेली नामे इसम नामे– **१. विजय निरंजन पेठे वय ३५ वर्ष २. पुजा विजय पेठे वय ३६ वर्ष ३. श्रावणी विजय पेठे वय ७ वर्ष यांना जखमी होण्यास तसेच ४. त्रिशा विजय पेठे वय ३ वर्ष ५. नेहारीका विजय पेठे वय ४ महीने सर्व रा कोच्छी ता सावनेर जि नागपुर यांना मरण्यास** बोलेरो वाहन क्र एम.एच. २७ बि.एक्स. ०२७३ चा चालक जबाबदार आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिल मधुकर गिरसावळे वय ५० वर्ष रा. पि.एच.सी. रोड कोंढाळी . ता.काटोल जि.नागपुर मो.क्र ९४२००८४६२७ यांचे रिपोर्टवरून पोस्टे कोंढाळी येथे बोलेरो वाहन क्र एम.एच. २७ बि.एक्स. ०२७३ चा चालकाविरूध्द कलम २७९,३३७,३३८,३०४अ भादवी सहकलम १८४,१३४, १७७ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस निरीक्षक. पंकज वाघोडे मो क्र ७३०४२१०७२४ हे करीत आहे.

## कायदेशीर रखवालीतुन पळुन जाणा–या विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन वेलतूर :–** अंतर्गत यातील फिर्यादी हे पो.स्टे.वेलतूर येथे कार्यरत असून मा. अतिरीक्त सत्र न्यायालय नागपूर यांचे कोर्टातुन स्पेशल पोक्सो केस क्रमांक ४५४/२०२१ कलम ३६३,३६६,३७६(२) (एन) ३७६ (३) भा.द.वि, सहकलम ४,६ पोक्सो मधील आरोपी नामे– **दिनेश मधुकर नरूले वय ३० वर्ष रा. जिवनापूर** तसेच स्पे.पोक्सो केस क्रमांक ४४५/२०२० कलम ३५४ (अ),(ब) भा.द.वि सहकलम ४ पोक्सो कायदा मधील **आरोपी नामे सुशांत धर्मराज वंजारी वय ३५ वर्षे रा.जिवनापूर** हया दोघांचा पकड वारंट प्राप्त झाल्याने त्यांचा शोध घेवून घरी हजर मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आणून स्टे.डा. अंमलदार विलास कोहळे व सिसीटिएनएस पो.अंमलदार अमर श्रावणकरयांच्या ताब्यात दोन्ही आरोपीतांना देखरेख मध्ये दिले असता. दिनांक २०/०८/२२ चे ०९/१५ वा. दरम्यान यातील नमूद आरोपी नामे– दिनेश मधुकर नरूले वय ३० वर्षे रा .जिवनापुर पुर्नवसन ता.कूही जि.नागपूर हा पोलीसाच्या कायदेशीर रखवालीतुन पळुन गेला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस अंमलदार पंकज लखन सावरे पो.स्टे.वेलतूर यांचे रिपोर्टवरून सदर गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयातील आरोपी नामे– **दिनेश मधुकर नरूले वय ३० वर्ष रा. जिवनापूर यास अटक करण्यात आली असुन पुढील तपास** सहायक पोलीस निरीक्षक आंनद कविराज,पो.स्टे. वेलतूर,ता.कूही.मो.न.८८८८२९१२३४.करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणा—याविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा शिवाजीपुरा बाजार चौक वार्ड क्र ५, कळमेश्वर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष ०९ महीने हिच्या अज्ञातपणाचा फायदा घेवून संशयीत आरोपी नामे— **गुनेश्वर ढलवार रा आष्टीकला १४ मैल खदान** याने दिनांक १०/०८/२०२२ चे १०/०० वा सुमारास फुस लावुन पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गून्हयातील आरोपीचा शोध सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस उपनिरीक्षक गायकवाड .मो नं ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन उमरेड** :— अंतर्गत मौजा मंगळवारीपेठ रेल्वे स्टेशन झोपडपट्टी उमरेड १५ किमी उत्तर. यातील मृतक नामे— **सुभाष संतोष मेश्राम वय ३२ वर्ष रा. मंगळवारीपेठ उमरेड** हे दिनांक १८/०८/२०२२ चे सकाळी ०९/४५ वाजता, सुमारास आपले घरून कामावर जांताना आपल्या घराचे काही अंतरावर रोडचे बाजुला पडुन त्यास उलट्या झाल्याने, त्याने कोणतेतरी विषारी औषध पिल्यासारखे वाटल्याने त्याची प्रकृती खराब झाली असता, त्यास प्रथम उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता, तेथुन रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संतोष हिरामण मेश्राम वय ६२ वर्ष रा. मंगळवारीपेठ उमरेड यांचे रिपोर्टवरून पोस्टे उमरेड येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास— सफौ/ संजय कुलकर्णी पो. स्टे उमरेड मो. क्र. ९४२२८१८०६२ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**